# प्रभुतरुण

| वर्ष ५३ | अंक १ | मुंबई | ऑगस्ट, २०१९ | पाने ६ | किंमत रु. १ |
|---|---|---|---|---|---|

(*स्थापना* : तारीख २५ ऑगस्ट १९२३)

**तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**

**www.prabhutarun.org**

*संपादिका:* **सुहासिनी कीर्तिकर**

*कार्यकारी संपादक मंडळ* : **मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**

*सहाय्यक संपादक:* **त्वरिता दळवी, राजेश नवलकर, भक्ती शेटचे**


*संपादकीय*

## चंद्र नभीचा ढळला

**—सुहासिनी कीर्तिकर**



साल १९९९. 'प्रभुतरुणा'तर्फे राणेवाडीत 'न भूतो न भविष्यति।' असा सोहळा साजरा झाला. तो खरं तर आमचे समर्थ संपादक श्री. सुहास कोठारे यांच्याच कारकीर्दीत योजलेला होता. पण ईश्वरी योजना काही निराळीच होती! मग त्यांच्या पश्चात् संपादकपदाची धुरा पेललेल्या श्री. विहंग नायक यांनी सुहास कोठारेंचे स्वप्न साकार केले. राणेवाडीत रथातून आलोक प्रधान आणि त्याची सौभाग्यवती ऐशाना परभू पोशाखात मिरवली. आनंदमेळा भरला होता. नंतर युवामंडळी तेथे नाचलीही. पण या सगळ्या हौशीमौजी वातावरणात, आनंद लुटण्यात एक प्रगल्भ समजदारपणा होता. म्हणजे या सगळ्या लयलूटीबरोबरच 'पाठारे प्रभूंचे योगदान' या विषयावर एक छान परिसंवाद रंगला होता. अध्यक्ष होते प्रमोद नवलकर. रवींद्र पिंगे प्रमुख पाहुणे होते. विहंगच्या मार्गदर्शना-खाली साऱ्या परिसंवादाचे सूत्रसंचालन मी केले होते. मुख्य म्हणजे परिसंवादाचा विषय ठरवला होता डॉ. सदाशिव गोरक्षकरांनी. आपल्या परभांची सुबत्ता असूनही इतर ज्ञातीयांसारखी आपली अशी कुठलीही बँक नाही; हे त्यांना खटकत होते. म्हणजे मुंबई घडविण्यात आपला मोठा भाग. संस्कृती, समृद्धी असूनही, सुधारणावादी आणि विचाराने प्रगत असूनही आपल्यात काहीतरी कमी आहे; त्याचा या निमित्ताने लेखाजोखा मांडावा असा त्यांचा विचार होता. विचार त्यांचा, प्रेरणा त्यांची म्हणून त्या सगळ्याच सोहळ्याला या परिसंवादामुळे एक विधायक रूप लाभले. मला वाटते की तेव्हापासून या विचारवंत, सौजन्यशील, ऋषीतुल्य व्यक्तिमत्वाची अन् माझी ओळख झाली. पुढे आणखी वेगळेच घडले. दहा वर्षांच्या झपाटलेल्या 'प्रभुतरुणा'च्या नंतरच्या कारकीर्दीत विहंग आणि मी अशी दोन चाके होती. एक चाक निखळून पडले अन् संपादक म्हणून माझ्यावर सारी भिस्त आली. यावेळी मला नैतिक बळ कुणी दिले असेल तर ते डॉ. गोरक्षकरांनी. पक्षिणीने दुरून आपल्या पिल्लांवर पाखर घालावी अशा तऱ्हेने ते 'प्रभुतरुणा'ची माझ्या कारकीर्दीतील वाटचाल न्याहाळीत. माझ्या लेखनाबद्दल प्रशंसा करणारे पोस्टकार्ड कधीतरी लिहीत. माझ्याच नव्हे तर; कार्यकारी संपादक असलेल्या सौ. संजना कोठारेच्या लेखावरही तिला कौतुकाची थाप मारणारे पत्र लिहीत. त्यांच्या अशा कृतिशील पाठिंब्यामुळे संपादक म्हणून मला नेहमीच बळ लाभले.

पुढे डॉ. गोरक्षकरांना 'पद्मश्री' हा बहुमान प्राप्त झाला. राष्ट्रपती अब्दुल कलाम यांच्या हस्ते हा बहुमान त्यांनी स्वीकारला तेव्हा जशी काही आपल्यालाच ही पदवी मिळालीय असा आनंद समस्त परभांना झाला. 'प्रभुतरुणा'तर्फे त्यांचा सत्कार झाला; त्यावेळचे त्यांचे भाषण माझ्या अजूनही आठवणीत आहे. आपल्या कर्तृत्वाचा अजिबात गर्व नाही. त्यांच्या चेहऱ्याला शोभणारी पांढरीशुभ्र दाढी हे जणू त्यांच्या ऋषीतुल्य व्यक्तिमत्वाचे प्रतिबिंबच होते. शांत भाव असलेले तेजस्वी डोळे, करारीपणा व्यक्त करणारी नासिका, नम्रता-शालीनता अंगी प्रत्यंगी भिनलेली... अशा रुपात त्यांनी अत्यंत जिव्हाळ्याने हा सत्कार स्वीकारला. पद्मश्री मिळणारी ही ज्ञातीतील पहिली व्यक्ती. पण कुठेही अहंकार नाही वागण्यात. निवृत्तीनंतरही आपल्या संशोधनकार्यात तितक्याच निष्ठेने ते रमून गेले होते. त्याचाच हा परिपाक होता.

याचाच भाग म्हणून त्यांनी अफाट परिश्रम करून, अभ्यास करून 'महाराष्ट्रातील राजभवने' हे पुस्तक सिद्ध केले. मुंबईतील राजभवनात याचे तत्कालीन मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुखांच्या हस्ते प्रकाशन झाले. अतिशय दिमाखदार तो प्रकाशनसोहळा. सॉलि. राजन जयकर, मी... असे काही ज्ञातीय याप्रसंगी निमंत्रित म्हणून उपस्थित होतो. (अर्थात श्री. राजन जयकरांचेही ही राजभवने पुस्तकात सामावण्यात योगदान होते) या शानदार सोहळ्यात माझ्या आजही लक्षात आहे ते गोरक्षकरांचे नम्र, सुरेख इंग्रजी भाषण. (मुख्यमंत्री विलासरावांच्या त्या दिवशीच्या भाषणातील इंग्रजीबद्दल न बोललेलेच बरे. त्या तुलनेत तर डॉ. गोरक्षकरांच्या इंग्रजी भाषणाचा जास्तच ठसा उमटला.)

'पद्मश्री' मिळाली ती राष्ट्रीय पातळीवर; तर महाराष्ट्र पातळीवर तितक्याच तोलामोलाचा 'चतुरंग'चा 'जीवनगौरव पुरस्कार' २०१७ साली त्यांना लाभला. 'चतुरंग'च्या रंगसंमेलनात त्यांच्याविषयीचे गौरवलेख समाविष्ट असणारी दैनंदिनी थाटामाटात प्रसिद्ध झाली. ही संमेलनस्थळी प्रसिद्ध झालेली दैनंदिनी खास संग्रहणीय अशीच. त्यात डॉ. गोरक्षकरांवर कितीतरी मान्यवरांनी आणि आप्तेष्टांनी लेख लिहिले आहेत. त्यांचे चिरंजीव श्री. मुकुंद, सूनबाई, पत्नी, नातेवाईक, सन्मित्र सुहास बहुलकर, मृदुला प्रभुराम जोशी अशा अनेकांनी गोरक्षकरांमधील पती, वडील, भाचा, मित्र, मार्गदर्शक, सेवाभावी अभ्यासक, संशोधक, राष्ट्रीय स्वयंसेवक संघातील तत्त्वनिष्ठ सेवक, ऋजू स्वभावाचे मित्र यांचे दर्शन घडविले आहे. त्यांचा स्वतःचा असा साडेतीन हजारांचा पुस्तकसंग्रह होता, याचाही त्यात उल्लेख आहे. भातसईच्या किनाऱ्यावरील 'गंधकुटी'तील सांसारिक सुखाचा गंध त्यातून दरवळला आहे. 'चतुरंग प्रतिष्ठान'तर्फे 'रंग संमेलन' ही दैनंदिनी आणि २००५ साली प्रसिद्ध झालेला 'साधना'चा अंक (ज्यात ज्ञानेश्वर मुळे यांनी लिहिलेला त्यांच्यावरील 'असहाय्य मध्यस्थाची भूमिका' हा लेख आहे.) डॉ. गोरक्षकरांनी मोठ्या आपुलकीने माझ्या संदर्भाकरिता मला पाठवून दिला. आत्ता त्यांच्या निधनानंतर मी ते अंक पुन्हा एकदा आठवणींच्या, दुःखाच्या धूसर जाळ्यातून पाहिले. जाणवले की त्यांचे संदर्भमूल्य आजही खूप मोठे आहे.

ज्ञानेश्वर मुळे यांच्या 'नोकर' 'शाई चे रंग' या लेखातील काही घटना वा संदर्भ इथे पुन्हा द्यावेसे वाटतात. पुप्पुल जयकर यांना ते सांस्कृतिक झारिना (सम्राज्ञी) म्हणतात; थोड्या उपहासानेच. भारतीय उत्सवावेळी त्यांनी नेमलेल्या संयोजकांत एकच मराठी माणूस होता- तो म्हणजे सदाशिव गोरक्षकर. मुंबईच्या प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियमचे संचालक. जपानच्या भारत महोत्सवात पाच हजार वर्षांच्या भारतीय संस्कृतीचे प्रतिनिधीत्व करणारे प्रदर्शन करायचे होते. प्रत्येक गोष्ट तपशीलात जाऊन जपानी माणसाबरोबर त्याच्याच जोडीने/तोडीने नियोजन करणारा हा माणूस होता. गोरक्षकर बुद्धिमान, स्वतंत्र बाण्याचे. त्यांनी पुप्पुल जयकरांना ठणकावले की 'एकदा विषय सांगितला की तुमचे काम संपले. बाकी सगळे मी स्वतःच्या मतानुसारच करणार.' आणि अनेक सव्यापसव्यानंतर पुप्पुलबाई नमल्या, जपानी संयोजक नमले कारण या संयोजकांनी मुंबईत येऊन गोरक्षकरांचे काम पाहिले. 'कडक शिस्तीच्या व तापट डोक्याच्या

(पान २ कॉलम १ वर)

संपादकीय

(पान १ कॉलम २ वरून)

व्यक्तीबरोबर काम करायला ते तयार झाले.' 'मृग- भारतीय कलेतील पशूपक्षी अशा शीर्षकाचे ते प्रदर्शन सर्वार्थाने सुंदर झाले; असे ज्ञानेश्वर मुळे यांनी त्या लेखात म्हटले आहे. या प्रदर्शनादरम्यान 'बारुदहान'ला तडा गेला; तेव्हा गोरक्षकरांनी निर्धाराने, तार्किक ठामपणाने त्याची पूर्ण रक्कम वसूल केली. हा तत्त्वाचा ठामपणा डॉ. गोरक्षकरांकडे होता. मृदुला प्रभुराम जोशींनीही स. मा. गर्गे यांच्या संपादनाखाली तयार होणाऱ्या पुस्तकावेळी गोरक्षकरांनी केलेल्या तत्पर मदतीविषयी, पुरवलेल्या संदर्भाविषयी भारावून या 'चतुरंग'च्या पुस्तकात लिहीले आहे. म्हणूनच तर डॉ. गोरक्षकर गेल्याची बातमी कळली तेव्हा त्यांना गलबलून आल्याची प्रतिक्रिया त्यांनी 'महाराष्ट्र टाइम्स', 'लोकसत्ता' या दैनिकांतून व्यक्त केली. (ही प्रतिक्रिया या अंकात इतरत्र देत आहे.)

नुकतेच भारताने वैज्ञानिक यशाची आणखी एक पायरी वर चढून आपले चांद्रयान यशस्वीपणे चंद्रावर पाठवले. अभिनंदनाची, सुखाचीच ही बाब आहे. (या चांद्रयान पाठविण्याच्या मोहिमेत माझ्या विद्यार्थ्यांची पत्नी सुनीता विनायक जोशीचा सहभाग आहे; ही आणखी आनंदाची गोष्ट) या सुखानंदाच्या लहरीवर स्वार होताना चंद्रावर डाग असावा त्याप्रमाणे डॉ. सदाशिव गोरक्षकर यांच्या निधनाचे दु:ख आहे. 'कॅलिगुला' या नाटकाचे रुपांतर पुरुषोत्तम दारव्हेकरांनी 'चंद्र नभीचा ढळला' या नावाने केलेय. डॉ. गोरक्षकरांच्या निधनाच्या संदर्भात माझी, आपली समस्त ज्ञातीयांची भावनाही तीच आहे. 'चंद्र नभीचा ढळला'. ढळला तरी या चंद्राच्या प्रकाशाच्या आठवणी श्री. मुकुंद सदाशिव गोरक्षकरांप्रमाणे आणि डॉक्टरांच्या इतर आत्मीयांप्रमाणे आमच्याही मनात कायम राहतील.

# रमत्या भूतकाळांतील मनभावी फेरफटका!

**-ॲड. केतकी रा. जयकर**

रॉयल एशियाटिक सोसायटीने मार्च महिन्यात भरवलेल्या प्रदर्शनाला मुंबईकरांनी मन:पूर्वक दाद दिली. 'स्टेप्स इंटू दी पोस्ट' मुंबईच्या फोर्ट विभागातील, व आजूबाजूच्या परिसराची माहिती, तिच्यातील प्रमुख इमारती, त्याचे आर्किटेक्चर ह्याची इतकी अभ्यासपूर्ण माहिती इतक्या कलात्मक रीतीने मांडली होती की मुंबई शहरावर मनापासून प्रेम करणारा प्रेमी असा विरळाच असेल, की जो प्रदर्शनाला आला नसेल!

ह्या प्रदर्शनाचे स्टार अट्रॅक्शन म्हणजे स्टेजवर उभी केलेली पाठारे प्रभूंच्या स्वयंपाकघराची प्रतिकृती! वजीर सुलतान सिगारेट निर्मात्यांच्या सौजन्याने उभे राहिलेले प्रदर्शन व त्यातील आपल्या परभांचे स्वयंपाकघर व ओसरी तर अप्रतीम होती. आपण प्रदर्शने अनेक पाहतो पण प्रदर्शनातील एक एक्झीबीट बनून मी जे मुंबईकरांचे दर्शन घेतले त्याची मजा औरच होती.

पाठारे प्रभू ज्ञातीय मुंबईतील सर्वप्रथम स्थायिक होणाऱ्यांपैकी अग्रगण्य होते व ते अशा प्रकारे राहात होते हे पाहून तर प्रेक्षक थक्कच होत. स्वयंपाकघरातील घंघाळ, बंब, शेगडी, आप्पे पात्र, शेवारा, हे पाहून तर लोकांना आश्चर्य वाटत होते. आजही ज्या वस्तू आपण सर्रास वापरतो त्यांची त्यांना नावेसुद्धा ठाऊक नाहीत! परंतू काही काही जुने पारशी होते; त्यांना मात्र जुन्या वस्तूबद्दल खूपशी माहिती दिसली. जी वयस्क माणसे आली होती ती मात्र आपल्या नातवंडांना आवर्जून अगदी स्टेजवर चढून जुन्या भांड्याची ओळख करून देत होती. मी स्टेजच्या काठाजवळच पाट घेऊन बसले होते. त्यामुळे मला प्रेक्षकांशी जवळून बोलता येत होते. पाठारे प्रभूचे प्रतिनिधी म्हणून बसताना व त्या प्रेक्षकांशी बोलताना मला अगदी अभिमान वाटला. मुंबईतील विविध क्षेत्रातील बुद्धिमंत त्या प्रदर्शनाला आले होते. चार्ल्स कोरियासारखे आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या आर्किटेक्टपासून 'गोदरेज' कंपनीच्या मालकिणीपर्यंत सगळ्यांनी आपल्या ज्ञातीचा इतिहास अगदी कौतुकाने ऐकला.

एक मात्र सातत्याने लक्षात आले की जुन्या मुंबईचे वैभव पाहून प्रेक्षकांना मात्र एक चुटपुट लागली होती की संथपणे, मंदगतीने चालणारी मुंबई किती सुंदर होती. त्यातील माणसांना वेळ नावाची लक्झरी होती. घाईगर्दीच्या, मिनिटे, सेकंदाच्या हिशोबाने जगणारी मुंबईकर मंडळी जणू भूतकाळात जाऊन तास दोन तास थांबली होती. अगदी मड्डम दिसणारी म्हातारी पारशीण तर चक्क माझ्या परवानगीने वर स्वयंपाकघरात चढून

(पान ५ कॉलम ४ वर)

## डॉ. गोरक्षकरांना लाभलेले पुरस्कार

1. 1985 - Vidyeshwari Award (Pathare Prabhu Community, Mumbai)
2. 1995- Rotary Award for excellence in performance in Art, History, Museology and Heritage preservation (Rotary Club of Bombay Pier)
3. 1998 - Inclusion in 'Cowrie Circle' for contribution to National / International field fo Museology (Commonwealth Association of Museums)
4. 2003- PADMA-SHRI by President of India
5. 2007- ''Sri Guruji Puraskar'' R.S.S. Janakalyan Samiti. Maharashtra
6. 2011- Tagore National Fellowship
7. 2012 - Jeevan Gaurav Puraskar ''Konkan Itihas Parishad''
8. 2012- ''Sai Ratna Puraskar'' Shiladhi Pratishthan, Shirdi.
9. 2016 - ''Jeevan Gaurav Puraskar'', Chaturanga Pratishthan.

# Guide, Friend & Philosopher

**-Rajan Motiram Jayakar**

It would be unfortunate for a hardcore collector not to meet a talented curator. A Collector always wants to show his collection to an enthusiastic audience but there is a technique called ''display'' which transforms collector's godown into a showroom. Luckily, I met Mr. Gorakshakar (hereafter Mr. G for short) about 40 years ago at the residence of my brother-in-law Dr. Vinod Dhurandhar (my wife Ketaki's sister Anuradha's husband), at Vile Parle. Incidentally Dr. Dhurandhar's cousin, Govindrao Agaskar was an avid matchbox label collector and wanted to show his collection to Mr. G and Dr. Dhurandhar being aware that I too was a matchbox label collector (Philluminist), thought of inviting me to that august meeting. Incidentally after about 10 years, Mr. Agaskar handed over his entire Matchbox label collection to me. That time Mr. G was the Director of Prince of Wales Museum (now renamed as Chhatrapati Shivaji Maharaj Vastu Sangrahalaya). On realizing that I was also a serious collector of various things, Mr. G invited me to visit the museum and offered to take me through some of the key galleries and spent about 2 hours with me explaining various aspects of the artefacts followed by tea and snacks at his residence in the Museum compound where I met his adorable wife, Geeta, Incidentally Mr. G was my wife Ketaki's cousin and with our meeting of minds, the two families came very close. I started visiting Mr. G almost every Saturday evening and he also learnt more about my varied collections and started advising me how to preserve objects of paper, metal, glass, porcelain, wood etc. which was base material of my collection. He used to help me fumigate my latest paper acquisitions such as books, engravings, etching and lithographs. My daughters became fond of Geeta and started calling her Geeta Kaku, which they still do. Their son Mukunda also used to join our discussions. A very remarkable feature of Mr. G which I noticed after visiting the Museum on numerous occasions, was that he interacted very fairly with all his museum staff. He not only trained them and shared his vast knowledge of Museology, but treated them as family. During every Museum function he publicity gave them as family. During every Museum function he publicly gave them their due recognition for the hard work put up by them.

At the time when I first met him in 1980's, I was doing research on the history of Pathare Prabhu Community and was collecting artefacts. At that time I also met a very interesting person Mr. Shivanandan Agaskar who was librarian of the Central library. Mr. Agaskar gave me references from books and papers particularly from books and papers particularly from asiatic society library as well as the Central Library, which are both housed in the Town Hall. I was also keenly interested in the history of Bombay and since Mr. Agaskar already knew Mr. G. we all three started meeting at Mr. G's residence in Museum Compound. With curator and librarian helping my collection and research, my work became extremely pleasurable.

In 1987, Bombay High Court was celebrating its 125th Anniversary and Mrs. Justice Sujata Manohar, as Chairperson of the exhibition committee planned to do an exhibition to display judicial treasure, which was lying in the High Court safes. Mr. G was contacted to curate the exhibition. There was an exhibtition committee of Judges and leading Advocates, who were appointed to assist the curator to

(Cont. on page 5 col.1)

भवताल

# कौटुंबिक हिंसाचार (Domestic violence)

-प्रणिता प्रभाकर

आजच्या २१व्या शतकात लग्न संस्था ही डळमळीत झालेली दिसत आहे.स्वत्वाची भावना उफाळून वर आल्यामुळे त्यांना त्यांची मोकळीक (Space) हवी असते, आणि म्हणूनच बंधन नको असते. परंतु निसर्ग नियमाप्रमाणे होणाऱ्या गोष्टी होत असतात व त्या तशा घडतही जातात. म्हणून प्रेमात पडून लग्नाच्या बंधनात न अडकता कसे काय आयुष्य जगता येईल; ह्याकडे आजच्या पिढीचा कल दिसतोय. म्हणून आजचा युवक हा लग्नाच्या बेडीत न अडकता एकत्र राहून सहजीवन जगण्याच्या प्रयत्नात असतो. (Live-in-Relationship). अशा प्रकारच्या सहजीवनात तडजोड नसते. स्वत:चं अस्तित्व पावलोपावली जाणवते. शारीरिक आकर्षणातून स्वभावमिलन जर झाले नाही किंवा होऊ शकले नाही तर एकमेकांना विभक्त होण्याची मोकळीक असते.त्यात त्यांना कशाचेही बंधन नसते. ते बंधमुक्त असतात.हे एकाअर्थी चांगलेच आहे, की सर्व गोष्टी थोडक्यात सावरून जातात. त्यात स्वत:ची व इतरांची (नातेवाईकांची अर्थात घरातील मंडळींची) फरफट होत नाही व मन:स्तापही होत नाही. कायद्याच्या चौकटीचा दंडुकापण बसत नाही आणि Live-in-Relationship ला मान्यता मिळाल्याने पूर्वीच्या भाषेतील 'व्यभिचारही' म्हणू शकत नाही. खरोखरच बंधमुक्त व सोयीस्कर जीवन आजची पिढी जगतेय.

२१व्या शतकाच्या सुरवातीला म्हणजे साधारण १९९९ ते २०१० ह्या १०-११ वर्षांच्या कालावधीत लग्नसंथा व कुटुंबसंस्थेत फारच उलथापालथ झालेली आपल्याला दिसून येते.म्हणजेच विभक्त कुटुंब पद्धती असूनही राजा-राणीच्या संसाराची स्वप्ने पाहिली जाऊ लागली व त्यामुळे घरात खटके उडू लागले.त्याची परिणती फारकतीत होत गेली.आपल्याकडे पुरुषप्रधान संस्कृती असल्याने पूर्वापार स्त्रियांना फारच हालअपेष्टांना तोंड द्यावे लागे आणि मूग गिळून बुक्क्यांचा मार खावा लागत असे. लग्नात मुलीकडून हुंडा मिळाला पाहिजे; हीसुद्धा एक प्रथाच होती व त्या प्रथेपायी अनेक मुलींना आपले जीव गमवावे लागले. ज्याला आपण हुंडाबळी म्हणतो. ह्या हुंड्याविरोधी कायदा जरी १९६१ साली आला असला; जो म्हणतोय की, 'हुंडा घेणे व देणे हा कायद्याने गुन्हा आहे'; तरीही आपल्या ग्रामीण भागात ही प्रथा चालूच राहिली व मुलींचे नाहक बळी जाऊ लागले. मुलींचे बळी जाण्याचे मुख्य कारण म्हणजे हुंड्यापायी सासरी मुलींना जाच होऊ लागला.मानसिक-शारीरिक त्रास होऊ लागला व त्यामुळे त्यांचा बळी जाऊ लागला.असे होऊ नये म्हणून २००५ साली गृह कलह -कौटुंबिक हिंसाचार /domestic violence पासून संरक्षण मिळावे ह्याकरीता कौटुंबिक हिंसाचार अधिनियम २००५/ Domestic Violence Act २००५ अस्तित्वात आला. परंतु ह्याचा विपरीत परिणाम म्हणजे; शहरी व शिकलेल्या मुलींनी गैरफायदा घेण्यास सुरवात केली.उठसूट कलम ४९८-अ लावून मुलांवर व त्याच्या घरच्यांवर केस/ फिर्याद करू लागल्या. परिणामी नाहक, मुलांना गजाआड दिवस कंठावे लागत. ही गोष्ट जेंव्हा कायदेतज्ञांच्या लक्षात आली तेंव्हा कायद्यात सर्वोच्च न्यायालयाने फेरफार केले व ते असे की, मुलींनी कौटुंबिक हिंसाचाराची तक्रार करताक्षणीच मुलाला उचलून गजाआड करण्यापेक्षा तक्रारदाराची तक्रार कुटुंब कल्याण समितीकडे (Family Welfare Committee) सुपूर्द करावी, जेणेकरून वादी आणि प्रतिवादीला योग्य न्याय मिळू शकेल.

आजची तरुणी किंवा स्त्री हुशारच नसून खूपच चतुर आहे. तिला तिची स्वतंत्र जागा व अस्तित्व तयार करायचे आहे.त्यामुळे तिने कायद्याच्या आधारे आपला हक्क व अस्तित्व दाखवण्याचा जोरदार प्रयत्न केला व काही अंशी तो सफल ही झाला. परंतु परिस्थिती आता इतकी चिघळली की मुली उठसूट ४९८-अ कलमाच्या आधारे आपला नवरा व इतर सासरच्या नातेवाईकांकडून लूटमार करू लागल्या.उदा: पोटगी, मुलांचा देखभाल खर्च, राहण्यासाठी जागा इत्यादी. तसेच शारीरिक व मानसिक छळ केल्याची नुकसान भरपाई वगैरे वगैरे. ह्यात खरोखरच काही पुरुषांची नाहक पिळवणूक व फसवणूक होत गेली. कारण मुलीने आपल्या नवऱ्याला व त्याच्या संपूर्ण कुटुंबाला कायद्याच्या धारेवर धरलेले असते व त्यात त्या मुलाची व त्याच्या कुटुंबाची फरफट (मानसिक व आर्थिक) झालेली दिसून येते. (लेखिका कौन्सेलर असल्याने तिच्या अनुभवाचे बोल आहेत) असे होऊ नये म्हणून (Save The Family Foundation) ही पुरुषांचे हक्क बजावणारी भारतातील कार्यकारी संस्था दावा करते की; कलम ४९८-अचा हमखास महिलांकडून दुरुपयोग केला जातो. इतकेच नव्हे तर, पुरुषांच्या हक्कासाठी संस्थेने चळवळही सुरु केली व त्यात इतर अनेक पुरुष हक्क संघटना उतरल्या आहेत. ह्या चळवळीचे समर्थक लिंग-तटस्थ (gender - neutral) कायद्यासाठी आवाहन करीत असून जो कायदा पुरुषांविरुद्ध आहे तो रद्द करावा. ह्या संस्थेच्या म्हणण्यानुसार पुरुषांविरुद्ध कौटुंबिक हिंसाचाराचे प्रमाण आजकाल खूप वाढलेले आहे. लोकलज्जेस्तव म्हणा किंवा पुरुषांविरुद्ध खोटीनाटी कारणे देण्यात येतात त्यामुळे म्हणा; पुरुषांकडून गुन्हा दाखल होत नाही व प्रकरणे तशीच झाकली जातात. बरेच पुरुष हिंसाचाराला कंटाळून आत्महत्याही करतात. त्यात विवाहित पुरुषांच्या आत्महत्येचे प्रमाण स्त्रियांपेक्षा आज ते जास्त आहे. 'ह्यात नक्की आकडा किती ते सांगू शकत नाही'! त्याकरिता सन २०१६ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने कौटुंबिक हिंसाचाराच्या कायद्यात बदल घडवून आणले . न्या. कुरियन जोसेफ आणि न्या. रोहिंटन फ. नरिमन ह्यांच्या खंडपीठाने गुरुवार ६ ऑक्टोबर २०१६ रोजी असे अमलात आणले की, ह्या कायद्या अंतर्गत जे स्त्री-पुरुषांमधील भेदभावाचे उद्दिष्ट होते तेच खूप त्रासदायक व मन:स्ताप देणारे वाटते. म्हणजेच कौटुंबिक हिंसाचाराच्या प्रणेत्या व अपराधी स्त्रियाही असू शकतात. म्हणून त्यातून 'प्रौढ पुरुष' हा शब्द काढून टाकला. इतके होऊनही आज मितीस 'Me Too' प्रकरणे काही संपत नाहीत व खरोखरच लग्न ही संस्थाच नाही; तर कुटुंब ही संस्थाच दोलायमान स्थितीत आहे.

तेंव्हा आजच्या तरुणांनी ह्यातून सुटका करून घेण्यासाठी Live-In-Relationship चा उत्तम तोडगा काढला आहे असे वाटते!!!

पान उलटताना

# सोरठ

-डॉ. सुमन सुवर्णकुमार नवलकर

लहानपणी आई तिच्या संक्रांतीच्या हळदीकुंकवाबरोबर गुड्डूचं पण हळदीकुंकू करायची. आईच्या मैत्रिणी, नात्या-गोत्यातल्या बायका यायच्या तशा गुड्डूच्याही मैत्रिणी यायच्या. आईने सर्वजणींसाठी एकसारखी वाणं आणलेली असायची. आणि गुड्डूच्या मैत्रिणींसाठी पण ती एकजात सारखी वाणं आणायची. गुड्डूला ते नको असायचं. गुड्डूच्या मैत्रिणींकडे हळदी कुंकवाला सोरठ असायचं. चार-पाच वेगवेगळ्या प्रकारची वाणं असायची. शिवाय एक 'लकी नंबर' असायचा. सर्व प्रकारच्या वाणांच्या चिठ्ठ्या एका वाडग्यात ठेवलेल्या असायच्या आणि एक असायची लकी नंबरची चिठ्ठी. हे वाण बऱ्यापैकी महागडं आणि सर्वांना हवहवंसं वाटेल असं असायचं. गुड्डूला वाटायचं, आपल्याही हळदी कुंकवात सोरठ असावं. एक छान लकी नंबरचं वाण ठेवावं. आईला हा भेदभाव पसंत नसायचा. एकीलाच कोणाला तरी लकी नंबर द्यायचा, म्हणजे बाकीजणी हिरमुसल्या होणार, हे नको असायचं आईला. मग काय राहिलं? चार-पाच वेगवेगळ्या प्रकारच्या वाणांच्या चिठ्ठ्या करून वाडग्यात ठेवायच्या आणि जी ज्या वस्तूची चिठ्ठी असेल ते वाण तिला द्यायचं. फुस्स! यात काय गंमत आहे?

एकदा गुड्डूला 'लकी नंबरचं' वाण मिळालं होतं. तो एक छोटासा चिनी मातीचा बाहुला होता. ढोपरांवर कोपर टेकून बसलेला. हातांच्या पंज्यांमध्ये हनुवटी टेकलेली आणि डोक्यावर कॅप. गंमत म्हणजे गुड्डूची ती मैत्रीण त्या वर्षी गुड्डूला हळदीकुंकुवाला बोलवायला विसरली होती. तिच्या बाकीच्या मैत्रिणी येऊन गेल्या होत्या, पण लकी नंबरची चिठ्ठी अजूनपर्यंत कोणीही उचललेली नव्हती. गुड्डू अंगणात खेळत असताना त्या मैत्रिणीने घरच्या खिडकीतून पाहून गुड्डूला हाका मारल्या. ''ये ना गं हळदीकुंकवाला, अशी कशी गं मी विसरले तुला बोलावायला?' पण आईला विचारल्याशिवाय कसं जायचं? गुड्डू घरी आली. आईला हळदीकुंकवाचं सांगितलं. आईला खरं तर त्या मैत्रिणीचं हे 'विसरणं' पटलं नव्हतं. पण मुलीचं मन मोडवेना. मग गुड्डूने खेळतानाचे कपडे बदलून छानसे कपडे घातले. हात-तोंड धुवून, केसांवरून फणी फिरवून गेली त्या मैत्रिणीकडे. चिठ्ठी उचलली, तर 'लकी नंबर'.

तेंव्हापासून गुड्डूचा विश्वास आहे, की आपलं नाव ज्या गोष्टीवर लिहिलेलं आहे ती गोष्ट आपल्याला मिळतेच. नाहीतर एवढ्या मैत्रिणी येऊन गेल्या, तरी चिठ्ठी का

(पान ५ कॉलम ४ वर)

आरोग्यम्

# रक्तदान

**-डॉ. छाया अजित देसाई**

रक्तदान म्हणजे एका व्यक्तीने स्वच्छेने आपले रक्त दान करणे, जे रक्त एखाद्या रुग्णाला उपयोगी पडते.

रक्तपेढीमध्ये रक्त साठवले जाते व ते गरजेनुसार रुग्णांना दिले जाते. रक्तपेढीमध्ये काम करणारे कर्मचारी

१) रक्त जमा करतात - कलेक्टिंग
२) त्याचे परीक्षण करतात - टेस्टिंग
३) साठवण्यायोग्य तयार करतात - प्रिपेरिंग
४) रक्तपेढीमध्ये रक्त साठवतात - स्टोरिंग

हे रक्त मुख्यत:(ट्रान्सफ्युजन) रक्त संक्रमणासाठी उपयोगी पडते. हे पूर्ण स्वरुपात किंवा त्याच्या घटक स्वरुपातही साठवले जाते.

**रक्तदान करणे सुरक्षित आहे का?**

रक्तदान करणे पूर्णत: सुरक्षित आहे. कारण रक्तदानासाठी नवीन, पुन्हा न वापरता येणारी (डिस्पोसेबल) सुई व उपकरणे (इक्विपमेंट्स) वापरली जातात, ती जिवाणूविरहित असतात त्यामुळे रक्तदात्याला कोणताही संसर्ग होण्याची भिती नसते.

रक्तदान केल्यापासून २४ तासाच्या आत तुमच्या शरीरातील द्रव (फ्ल्युईड) भरून निघते व ६ ते ७ आठवड्यात लाल रक्तपेशीसुद्धा भरून निघतात.

**रक्तदान कोण करु शकते?**

रक्तदान करण्याकरिता काही अटी आहेत.

१) रक्तदान करणारी व्यक्ती निरोगी असली पाहिजे. तिला कोणत्याही प्रकारचे संक्रमक रोग नसावे.
रक्तदान करणाऱ्या व्यक्तीचे वय १८ ते ६५ असावे व वजन ५० किलोपेक्षा कमी असू नये.
३) नाडीचे ठोके ५० ते १०० मध्ये असावे व त्यात अनियमितता नसावी
४) त्यांचे हिमोग्लोबिन १२.५ ग्रॅम पेक्षा कमी नसावे

**रक्तदान कोण करु शकत नाही?**

१) गरोदर स्त्रिया व स्तनपान करणाऱ्या महिला
२) रक्तदान करण्यापूर्वी ७२ तास मद्याचे सेवन केले असेल तर
३) ज्यांना रक्तदाबाचा त्रास आहे अशा व्यक्ती
४) ज्या व्यक्तींना खालील रोगांची लागण असेल त्या व्यक्ती- एच. आय. व्ही., काविळ, मलेरिया इत्यादी.

भारतात रक्तदान बऱ्याच संस्था किंवा इस्पितळांमध्ये केले जाते. रक्तदाता रक्तदानाकरिता, रक्तपेढी किंवा इस्पितळांमध्ये जाऊ शकतो. अथवा रक्तदान शिबिरांमध्ये जाऊन सुद्धा रक्तदान करू शकतो.

रक्तदान शिबिरे काही संस्थांद्वारे आयोजित केली जातात. १ जुलै हा 'डॉक्टर्स डे' म्हणून साजरा केला जातो. त्या दिवशी असोसिएशन ऑफ मेडिकल कंसल्टंट (एएमसी) द्वारे मुंबई व उपनगरात बरेच ठिकाणी रक्तदान शिबिरे आयोजित करण्यात येतात. आणि खास उल्लेखनीय म्हणजे बरेच डॉक्टर ह्या दिवशी स्वत: रक्तदान करतात.

(आयएमए) इंडियन मेडिकल असोसिएशनद्वारेसुद्धा ह्या दिवशी रक्तदान शिबिरे आयोजित करतात.

२००६ ते २००७ मध्ये ४४ लाख युनिट रक्त भारतात जमा केले होते. तर २०१६ मध्ये १ कोटी ९ लाख युनिट रक्त जमा केले गेले. हे आकडे जरी सुधारत असले तरी दरवर्षी भारतात १ कोटी २० लाख युनिट रक्ताची गरज आहे.

प्रत्येक रक्तदात्याकडून ३५० मिलि रक्त जमा केले जाते. रक्तदान केल्यानंतर दात्यांना कॉफी व ग्लुकोज बिस्किटे दिली जातात त्यामुळे त्यांना अशक्तपणा जाणवू नये.

काही संस्था रक्तदात्यांना घरी सोडण्याची जबाबदारी स्वीकारतात. रक्तदात्यांना प्रमाणपत्रही दिले जाते.

पूर्ण रक्त देणे ही सर्वांना सोपी व प्रचलित पद्धत आहे. परंतु रक्ताचे वेगवेगळे घटकही करू शकतात. घटक केल्यास एक युनिट रक्त बऱ्याच रुग्णांना उपयोगी पडू शकते.

रक्तातून वेगळे केले जाणारे घटक

१) लाल रक्तपेशी (आर.बी.सी.)
२) प्लेटलेट
३) प्लाझ्मा
४) क्रायोप्रिसिपिटेटेड ए. एच. एफ.
५) ग्रॅनुलोसाईटस्
६) सफेद रक्तपेशी

रक्तदान केलेले रक्त जर लगेच वापरण्याची गरज नसेल तर ते ३५ दिवसांपर्यंत रक्तपेढीमध्ये साठवता येते.

एक युनिट रक्त रुग्णाला दिले तर ते साधारणत: पाऊण ते एक युनिट रक्तातील हिमोग्लोबिनची वाढ करण्यास उपयुक्त ठरते.

तेव्हा सारांश असा आहे की रक्तदान हे श्रेष्ठदान आहे व रक्तदान केल्याने दात्याला अपाय तर होतच नाही. शिवाय ज्याला आपण दान करतो अशा रुग्णाला फारच फायदा होऊ शकतो.

# डॉ. सदाशिव गोरक्षकरांची निवृत्ती

परवा कुठेतरी बातमी वाचली की प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियमचे डायरेक्टर, आपले डॉ. सदाशिवराव गोरक्षकर हे आपला सेवाकाल पूर्ण करून गेल्या महिन्यात निवृत्त झाले आहेत. म्युझिऑलॉजी हा काही सर्वसामान्यांचा विषय नव्हे! सामान्यांना त्यात रुचीही कमी अन गतीही कमी! परंतु असे असूनसुद्धा डॉ. गोरक्षकरांची छबी वृत्तपत्रांतून दिसून आली, दूरदर्शनवर त्यांचे दर्शन झाले की अभिमानाने छाती ताठ होत असे. आमचे एक ज्ञातीबांधव देशांतील पंतप्रधानांपासून अनेक मोठमोठ्या अथिरथी-महारथी समवेत वावर करीत आहेत. त्यांचा शब्द या थोरामोठ्यांकडून मोठ्या आस्थेने ऐकला जातोय हे पाहून आम्हा सामान्यांना कोण आनंद होत असे. ज्ञातीबंधुत्वाचा दोरखंड हाती धरून डॉ. गोरक्षकरांसारख्या आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या विद्वानाशी जवळीक साधण्याचा प्रयत्न करणे कितपत संयुक्तिक आहे कुणास ठाऊक. पण ती एक नैसर्गिक भावना आहे एवढे मात्र खरे! आपल्या करंट्या राजकारण्यांनी ज्ञाती या संज्ञेला दुर्गंध चिकटविला आहे. अन्यथा कुटुंबप्रेम, ज्ञातीप्रेम, प्रांतप्रेम व शेवटी राष्ट्रप्रेम या नैसर्गिक भावनाच आहेत. त्यानुसार डॉ. गोरक्षकरांचा तेज:पुंज चेहरा टी.व्ही.वर आला की हातातील काम टाकून डॉ. गोरक्षकर काय सांगताहेत ते ऐकण्या पहाण्यापलिकडे अन्य लक्ष जात नसे. परवा फेरीवाल्यांच्या म्युझियमवरील वाढत्या आक्रमणाच्या संदर्भात हे जर आक्रमण सरकारने थांबविले नाही तर म्युझियम बंद करून टाकीन असे सरकारला खरपूस सुनावणारे डॉ. गोरक्षकरांचे निस्पृह रामशास्त्री रूप पाहिले आणि धन्य वाटले.

एकदा कधीतरी बोलण्याच्या ओघात डॉक्टरसाहेबांनी मुंबईजवळ आसनगांव येथे फार्म हाऊस उभारले असल्याचे कळले. आता निवृत्तीनंतर डॉक्टरसाहेबांचे काय मनसुबे आहेत; हे माहीत नाही. परंतु फार्महाऊसवर आतापर्यंत न जोपासता आलेले छंद जोपासण्यात रममाण होण्याचा आनंद घ्यावा असाही त्यांचा विचार असण्याची शक्यता आहे.

हा झाला डॉक्टर साहेबांच्या पक्षाचा विचार! पण पाठारे प्रभु ज्ञातीचा काय विचार? आपल्या संस्थांनी डॉक्टर साहेबांच्या ज्ञानाचा, अधिकाराचा आजपर्यंत करून घ्यावा तेवढा उपयोग करून घेतला नाही. डॉक्टर साहेबांच्या अंत:करणात ज्ञातीप्रेमाचा निर्मळ झरा वाहतोय एवढे निश्चित! कारण साध्या प्रभु तरुणाच्या दीपावली अंकाचे प्रकाशन करावयाची विनंती करताच एवढे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे प्रकांड पंडीत डॉक्टरसाहेब आपले मोठेपण विसरून खारच्या सोसायटीच्या पडक्या हॉलमध्ये सहजी येऊन दाखल झाले. पाठारे प्रभु ज्ञातीच्या अभ्युदयासाठी चार हिताच्या गोष्टी मोठ्या जिव्हाळ्याने व आत्मीयतेने त्यांनी सांगितल्या! पाठारे प्रभु ज्ञातीने ही संधी सोडता कामा नये. पाठारे प्रभु ज्ञातीची जी मध्यवर्ती संस्था पाठारे प्रभु चॅरीटीझ या संस्थेच्या विश्वस्तपदी डॉक्टर गोरक्षकर, श्री. मुकुंद अजिंक्य यांच्यासारख्या व्यक्ती येणे हे चॅरीटीझच्या व पर्यायाने पाठारे प्रभु ज्ञातीच्या हिताचे होणार आहे. गरज आपली असल्यामुळे अशा महनीय व्यक्तींना आपल्या संस्थेत सन्मानाने आणण्याचे काम संस्थेच्या सद्य धुरीणांना करावे लागेल. व संस्थेचे हित लक्षात घेऊन त्यांनी ते अवश्य करावे असे मी तरी म्हणेन! संस्था धुरीणांचा यावर काय विचार असेल ते असो.

परंतु तोपर्यंत डॉ. सदाशिव गोरक्षकरांनी विविध स्तरावरून राष्ट्राची जी भरीव सेवा केली, ती करताना कर्तव्यतत्पर व नि:स्पृह सेवेचा जो आदर्श निर्माण केला व ज्यामुळे ते जेथे जेथे जातील, तेथे सदैव ते आदरासच पात्र झाले, त्या गुणात्मक प्रदीर्घ सेवेबद्दल विनम्र अभिवादन करतो अन निवृत्तीनंतरचे त्यांचे आयुष्य त्यांना प्रिय असलेल्या उद्योगाच्या पूर्तीतच व्यतीत होवो अशी शुभेच्छा व्यक्त करतो.

**-सुहास कोठारे**

(प्रभुतरुणच्या जुन्या अंकातून पुनर्मुद्रित)

## सदाशिवराव गोरक्षकर: प्रसिद्धीविन्मुख ऋषी!

सदाशिवराव गोरक्षकर यांच्या निधनाबाबतचे वृत्त वाचले आणि मी गलबलून गेले. त्यांच्याबरोबर असलेल्या दीर्घ संबंधातल्या अनेक आठवणींनी मनात फेर धरला. या ऋषितुल्य व्यक्तिमत्त्वाची छाया आता कायमची हरपली या भावनेने मन शोकाकुल झाले. त्यांच्या निधनाने संग्रहालय क्षेत्राचीच नव्हे, तर एकूणच कला संस्कृती-संवर्धन क्षेत्राची फार मोठी हानी झाली आहे. ते तपोवृद्ध, ज्ञानवृद्ध तर होतेच, पण आपल्याकडे असलेले ज्ञान मुक्तहस्ते वाटण्याचे औदार्यही त्यांच्याकडे होते. अत्यंत निर्लोभी माणूस म्हणून अनेक जण त्यांना ओळखत असतील. इंदिरा गांधींपासून दलाई लामापर्यंतच्या अनेक मोठ्या व्यक्तींच्या विश्वासातले असूनही त्यांनी कधी त्याचा स्वार्थासाठी लाभ करून घेतला नाही. त्यांच्या स्वभावाला अनेक लोभस पैलू होते. प्रसिद्धीविन्मुखता हाही असाच एक गुण. त्यामुळे संग्रहालयशास्त्राच्या क्षेत्रात त्यांनी जागतिक स्तरावर कितीही कीर्ती मिळवली असली, तरी त्यांचा कधी उच्चारही त्यांनी केला नाही. अशा व्यक्तीचे जाणे चटका लावून जाते.

**-मृदुला प्रभुराम जोशी**

*

(Cont. from Page 2 col. 4)

set up the exhibition. An advertisement was issued in newspaper, asking members of public to lend any material, that could be useful for the exhibition. I, being a Solicitor, practicing in High Court, contacted Mrs. Justice Manohar and requested her to include me in the exhibition committee, which she willingly did. Mr. G was also happy that he had an enthusiastic assistant for setting up the exhibition. That was the first time, I worked with him in organizing a mega exhibition. The exhibition received positive publicity through newspapers and for the first time people and even Advocates saw the wonderful Charters of King George IV and Queen VIctoria establishing Supreme Court and High Court respectively in Bombay alongwith Barristers' Certificates of Mahatma Gandhi, Mahammed Ali Jinnah, Vallabhbhai and Vithalbhai Patel, Dr. B. R. Ambedkar among other artefacts, not seen before. Advocates also enthusiastically contributed their personal artefacts.

I learnt from Mr. G how to organize an exhibition by first tracing the history through research of the period to be depicted and preparing a theme. Restoring the artefacts, and planning their display in a particular sequence was the next step. Appropriate captioning and historical data was required to be put alongwith artefact. Proper display material such as horizontal frames, vertical frames, lighting, highlighting key artefacts, breaking monotony by including leafy plants at strategic points and whole lot of techniques were on display at that exhibition.

The next exhibition, on a much smaller scale, was put up in Town Hall, as part of a larger exhibition of photographs of old Bombay in 1989. Mr. G suggested that a verandah and kitchen from Pathare Prabhu Household of 19th Century be created, since Pathare Prabhus, were the earliest immigrants to Bombay Islands, in the late 13 Century. The artefacts for kitchen were mainly provided from my collection and of Verandah were from Mr. G's Collection. At the suggestion of Mr. G, my family and me sat as ''live'' models alternating between verandah and kitchen in our traditional dress and gave information to the visitors to the exhibition about our Community and also the use of various utensils and kitchen implements which were particular to our community. "Live" models was a novel way of communication suggested by Mr. G.

In 1999 the Hon'ble Supreme Court decided to have an exhibition in Delhi as part of its Golden Jubilee celebration and Mrs. Justice Sujata Manohar, who by then was elevated to Supreme Court, was appointed Chairperson of the exhibition Committee. It became apparent that Mr. G and myself would be asked to be the Curator and Asst. Curator respectively. It was a challenging project. The exhibition was at National Museum in Delhi. Artefacts in custody of various High Courts in India had to be identified and physically checked by going to the High Courts to find out whether they could be displayed in the Exhibition. Artefacts concerning Federal Court and Supreme Court had to be searched in Parliament House as both Federal Courts (1935-1950) and Supreme Court (1950-1957) sat in Parliament House, in Prince's Chamber, before the present Supreme Court building was constructed. With permission to visit any place for searching for artefacts and the Director of National Archives and Secretary of Ministry Culture on board, it was easy to visit places where you could not visit otherwise. I even visited the office of Privy Council in London and obtained certain documents for the exhibition. It was an object lesson for me how to decipher from vast available data and artefacts, which was important to the theme of the exhibition and Mr. G went about it in a professional manner. Since we travelled together to most of the High Courts and shared the room during our overnight stays, I got a chance to meet Mr. G. the simple man, who washed his own clothes and was ready to rough it out when situation demanded. He was not fastidious like me, about food during travel and led a disciplined life by observing time schedules. I think Geeta Kaku must get some credit as she stood rock solid with him in his endeavours and braved the cold of Delhi in January 2000, to be with him during the setting up of the exhibition. His life style was orthodox. But curatiorial thinking was modern and he always strived to put in place the latest techniques regarding display. With close association with Mr. G, I realised that I was also transformed into a collector-cum-curator, as some of the curatorial qualities of Mr. G got unknowingly ingrained in me. I started looking at objects with a different perception and tried to imbibe the techniques which I learnt during the exhibition projects, with Mr. G. Because of the knowlede and experience which Mr. G. had shared with me, I could successfully curate the following prestigious exhibitions :

(a) Exhibition of personal Collection of Judicial archives to celebrate 100 years of Bombay Incorporated Law Society at High Court Annexe in 1995.
(b) Exhibition of personal collection of Picture Postcards of Old Bombay to Commemorate 125 years of Bombay Port Trust at Darbar Hall of Asiatic Society of Bombay in 1998.
(c) Exhibition of personal collection of Picture Postcards of Old Bombay to Commemorate 150 years of David Sassoon Library at Library premises in 1999.
(d) Exhibition of personal collection of lithographs, engravings and photographs of Old Bombay at David Sassoon Library in 2000.
(e) Traveling Supreme Court Exhibition, at Prince of Wales Museum in 2000, when I came to Bombay.
(f) Exhibition to Commemorate 200 years of birth of Dr. John Wilson at Wilson College in 2004.
(g) Year-long Exhibition to celebrate 150 years of the Bombay University at the Fort Library, below Rajabai Tower in 2007, which was visited by President Dr. A.P.J. Kalam, Prime Minister Mr. Manmohan Singh and President Smt. Pratibha Patil.
(b) Exhibition as a tribute to the memory of late Shammi Kapoor out of personal collection of memorabilia at Prince of Wales Museum from 8th October, 2011 to 30th October, 2011.
(i) Exhibition to celebrate 150 years of Bombay High Court in the Central Court Room from 15.8.2012 to 23.10.2012 and carried the exhibition to Nagpur and Aurangabad Benches and High Court at Goa in 2013.

On the basis of vast experience of curating the above exhibitions, I ventured to suggest to the then Chief Justice of Bombay High Court, Mr. Justice Mohit Shah, in 2014, that I should be permitted to set up Museum of Bombay High Court, instead of holding exhibition every 25 years. Justice Shah was very positive and allowed me to set up the Museum in Room No. 17 in Bombay High Court, which was inaugurated by the Prime Minister Mr. Narendra Modi in February 2015. If Mr. G had not been my guide, friend and philosopher, this Museum would not have been possible. I dedicate the success and popularity of this Museum to Mr. G. This Museum has opened avenues for me to set up Museums in Madhya Pradesh High Court at Jabalpur, Andhra Pradesh High Court at Hyderabad, Uttar Pradesh High Court at Allahabad and Punjab & Haryana High Court at Chandigarh. I hope my dream of setting up Museum in every High Court as converyed to the Chief Justice of India, will fructify one day and Mr. G will be there to bless me, when I set up the last of the High Court Museums.

('चतुरंग दैनंदिनी' मधून पुनर्मुद्रित)

*

(पान २ कॉलम ४ वरून)

आली आणि आप्पेपात्र अगदी हळूवारपणे उचलून मला सांगितले की तिची आजी उदवाड्याला राहत होती व त्याच भांड्यात 'पोपटजी' नावाचा तळलेला प्रकार करीत असे!! 'नॉस्टालजीया' हा शब्दच इथे अगदी फिट्ट बसतो!! प्रदर्शनाचे विद्वान समीक्षक असेही म्हणाले असतील की भूतकाळात गडप झालेल्या वैभवाचे काय कौतुक करावयाचे! पण मी जे प्रेक्षकांच्या डोळ्यात पाहिले ते वेगळेच भाव होते. जुन्या मुंबईतील ट्रॅमची चित्रे, विक्टोरिया, जुने पेहराव केलेली माणसे, हे फोटो पहावयास नुसतेच आपले लोकच नव्हे तर अगणित परदेशी माणसे प्रदर्शनाला आली होती व आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्यांना आपल्यापेक्षा मुंबईबद्दल माहिती आहे व आस्थादेखील आहे.

प्रदर्शनाच्या सजावटीचा सर्वात मोठा सिंहाचा वाटा अर्थात प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियमचे डायरेक्टर श्री. सदाशिव गोरक्षकर ह्यांचा होता. ओसरीवरील काचेची हंडी, हिंदोळा, सांबरशिंग, कुटुंबप्रमुखाची तसबीर, रविवर्म्याचे चित्र, चक्रावर विणलेला वेणीच्या सुताचा टेबलक्लॉथ ह्या सगळ्या वस्तू गोरक्षकरांनी उपलब्ध करून दिल्या होत्या व त्या कलात्मक दृष्टीने रचूनही ठेवल्या होत्या.

(प्रभुतरुणच्या जुन्या अंकातून पुनर्मुद्रित)

---

(पान ३ कॉलम ४ वरून)

कोणाच्या हाती लागली नाही! गुड्डूची नात आता हळदीकुंकू करायच्या वयाची आहे. एकदा गुड्डूने विचार केला, 'आपल्या लहानपणी आपण सोरठ-वाणं हळदीकुंकू करणार होतो, तर आपल्या आईने आपल्याला करू दिलं नाही. आपल्याला मुलगीच झाली नाही. झाला तो मुलगाच. आता नातीचं करावं का?' गुड्डूने आपला बेत नातीला सांगितला. नातीने ऐकून तर घेतलं. पण शेवटी म्हणाली, 'शी आजी, हळदीकुंकू म्हणजे ते कपाळावर लाल-पिवळे ठिपके लावतात ते? मला नको असलं काही. तिळाचे लाडू मात्र कर मस्तपैकी आणि बरोबर चिक्कीपण कर शेंगदाण्याची.'

गुड्डूआजीच्या शोकेसमध्ये अजूनही तो चिनीमातीचा बाहुला आहे. नातीने आजीला जे काही म्हटलं, ते ऐकून तो हसला शोकेसमधून. म्हणाला, 'ज्या गोष्टीवर आपलं नाव लिहिलेलं असतं ना, ती आपल्यालाच मिळते. पण ज्या गोष्टीवर आपलं नाव नसतं लिहिलेलं, ती नाही म्हणजे नाहीच मिळत आपल्याला.''

*

## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) अ‍ॅड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे,
कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर,
कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे
यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व
कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक
३२) कै. सौ. विजया व श्री. प्रकाश माधव नायक या त्यांच्या आईवडिलांच्या स्मृत्यर्थ उन्मेष प्रकाश नायक
३३) सौ. वृंदा आणि श्री. शाम विनायक जयकर
३४) कै. श्रीमती जयश्री आणि कै. श्री. जयवंत विश्वनाथ कीर्तिकर स्मृत्यर्थ श्री. उमेशचंद्र जयवंत कीर्तिकर
३५) कै. श्रीमती प्रतिमा आणि कै. श्री. धाकलेश्वर बाळाजी जयकर स्मृत्यर्थ सौ. सुप्रिया उमेश कीर्तिकर

## प्रभुतरुणास देणगी

✶ श्री. दीपक माधवराव धैर्यवान यांजकडून त्यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसाप्रीत्यर्थ रु. १००१/-

✶ प्रभुतरुणाच्या वर्धापनदिनानिमित्त श्रीम. वृंदा श्याम जयकर यांजकडून रु. १०००/-

सर्व देणगीदारांचे आभार.

## अभिनंदन

✶ कु. श्रद्धा दीपक धराधर यांना नॅशनल कराटे चॅंपियनशिप २०१९ स्पर्धेत सीनियर स्त्री वैयक्तिक 'काता' प्रकारात कांस्यपदक प्राप्त झाले.

✶ श्रीमती बिंबा मनोज नायक यांना 'पेस्ट्री इंडस्ट्री' संवर्धनासाठी जीवनगौरव पुरस्कार लाभला.

✶ 'प्रभुप्रभात'च्या संपादिका, पा. प्र. महिला समाज आणि पा. प्र. सोशल समाजाच्या विश्वस्त श्रीम. वृंदा जयकर यांच्या ३ ऑगस्ट रोजी झालेल्या सहस्त्रचंद्र सोहळ्याबद्दल शुभेच्छा.

✶ पा. प्रभुंची कसबी साडी पोस्टाच्या स्टॅंपवर विराजमान झाली.

✶ कु. वैजयंती विश्वास अजिंक्य यांची कॅलीग्राफी आणि टाय-पोग्राफीच्या मास्टर्स डिग्रीसाठी जे. जे. स्कूल ऑफ आर्टस्मध्ये निवड झाली.

✶ पाठारे प्रभु चॅरिटीजचे 'न्यूज लेटर' प्राप्त झाले.

सर्वांचे मन:पूर्वक अभिनंदन.

## परीक्षेतील सुयश

**दहावी (एस. एस. सी)**

श्री. आर्य समीत रसिक विजयकर ६६%

श्री. पार्थ इंद्रजित कीर्तिकर ८१.८% ४०९/५००

कु. करीना प्रकाश धुरंधर ८६%

**बारावी (एच.एस.सी.) कॉमर्स**

श्री वेदांत नरेन्द्र धैर्यवान ८९.२३%

कु. श्रद्धा दीपक धराधर ८३%

**बारावी (एच.एस.सी.) सायन्स**

श्री. निमिष महेश जयकर ७०%

**बी. आर्च.**

कु. सिमरन मनीष धैर्यवान

**बी. ई. (कॉम्प्युटर इंजिनीयरिंग)**

कु. निकीता महेश जयकर CGPA 8-83/10

**एम. बी. ए. (जानकीदेवी बजाज इंस्टिट्यूट, ह्यूमन रिसोर्सेस)**

कु. रोमा अनीश देसाई, 'ए' ग्रेड

✳

## सूचना

वैयक्तिक वा कौटुंबिक हेवेदावे वा अंतर्गत कलह सांगणारी **निनावी पत्रे** कृपया संपादकांना पाठवू नयेत. संपादकांचा दूरान्वयानेही त्यांच्याशी संबंध नसतो. ज्ञातीतील घडामोडींची 'प्रभुतरुण' सुसंस्कृत नोंद घेतो. पण आपापसातील ग्रह, दुराग्रह, कलह, भाष्य इत्यादीत 'प्रभुतरुणा'ला काहीही गम्य नाही. कृपया नोंद घ्यावी.

✳

## प्रभुतरुणाची डायरी

### विवाह सुवर्णमहोत्सव

१८-०५-१९ श्री. अरुण केशवराव विजयकरे कु. मृदुला यशवंत कीर्तिकर
१८-०५-१९ श्री. सुरेश शामराव कोठारे कु. अनुपमा रामदत्त अजिंक्य

### मरण

२५-०५-१९ सौ. नीता विजय धुरंधर, वय ७२, ठाकुरद्वार
१३-०७-१९ पद्मश्री डॉ. सदाशिव वसंतराव गोरक्षकर, वय ८६, वासिंद
३१-०७-१९ श्रीम. मोहिनी मदन कोठारे वय ८८ राणेवाडी-अंधेरी

चुकीची दुरुस्ती

२६-०६-१९ श्रीम. गीता प्रिभु नवानी, वय ९१, कल्याण
(पूर्वाश्रमीच्या कु. सोना नारायण नवलकर)

## पाठारे प्रभु सोशल समाज

✶ दि. १३ जुलै, २०१९ रोजी पा. प्र. सोशल समाजातर्फे पाठारे प्रभु चॅरिटीजच्या व्यंकटेश मंदिरात अतिशय उत्साहात, श्रोत्यांच्या प्रचंड प्रतिसादात अभंगयात्रा संपन्न झाली. गेली ३७ वर्षे ही यात्रा अखंडपणे चालू आहे हे विशेष. श्री. अभिजित विजयकर यांजतर्फे व्यंकटेशाला हार आणि श्रीफळ अर्पण केल्यानंतर समाजाच्या चिटणीस सौ. नीता सेंजित यांनी सर्वांचे स्वागत केले. समाजाच्या विश्वस्त श्रीम. वृंदा जयकर यांनी प्रास्तविक केल्यावर समाजाध्यक्षा श्रीमती स्वाती राणे यांनी दरवर्षीप्रमाणे भावपूर्ण सूत्रसंचालन केले. या अभंगयात्रेत एकूण बावीस जणांचा समावेश होता. याप्रसंगी विश्वस्त श्रीम. वृंदा जयकरांतर्फे पेढ्यांचा प्रसाद होता तर; कॉफीचा लाभ विश्वस्त श्रीम. प्रमिला तळपदे यांजमुळे झाला. कार्यक्रम यशस्वी करण्यात गायक-गायिका, वाद्यवृंदाचा वाटा होताच; पण समाजाचे संयुक्त चिटणीस श्री. जयंत कीर्तिकर आणि सौ. नीता सेंजित यांचेही प्रयत्न होते. पाठारे प्रभु चॅरिटीजने दरवर्षीप्रमाणे मदतीचा हात पुढे केला. मुंबईत तालमीसाठी सौ. मेघना आणि श्री. प्रदीप राणे यांनी, तसेच खारला श्रीमती स्वाती राणे यांनी आपले निवासस्थान उपलब्ध करून दिले. स्वाती राणे यांच्याकडे खानपान व्यवस्थाही होती, तिला श्री. जयंत कीर्तिकर, सौ. पल्लवी कोठारे यांनी हातभार लावला.

✶ पाठारे प्रभु सोशल समाजाची एक दिवसीय वर्षासहल यावर्षी रविवार, दिनांक २१ जुलै, २०१९ रोजी गोराई येथील 'फार्म रेसिडन्सी रिसॉर्ट' येथे गेली होती. या सहलीत एकूण बत्तीस जणांचा सहभाग होता.

✶ समाजाचा वार्षिक अहवाल प्राप्त झाली.

✳

## पाठारे प्रभु महिला समाज

✶ पा. प्र. महिला समाजाचा वार्षिक अहवाल सभासदांना घरपोच प्राप्त झाला.

महिला समाजाची वार्षिक सर्वसाधारण सभा २५ ऑगस्ट २०१९ रोजी ठाकुरद्वार येथील प्रभु सेमिनरी शाळा सभागृहात अध्यक्षा सौ. नीता सेंजित यांच्या अध्यक्षतेखाली दुपारी ४ वाजता आयोजित करण्यात आली आहे.

✶ वार्षिक सभेबरोबरच त्याच ठिकाणी सायंकाळी ४ वाजता महिलांसाठी हस्ताक्षर स्पर्धा (वेळ अर्धा तास) आणि निबंध स्पर्धा होईल. निबंध स्पर्धेत महिलांसाठी 'स्त्री म्हणजे तारेवरची कसरत' आणि मुलींसाठी 'पाणी वाचविण्याचे महत्त्व; हे विषय घरून लिहून आणणे. तसेच 'बालपण' या विषयावर काव्यस्पर्धाही आहे.

✶ ज्या मुलींना शिष्यवृत्ती अर्ज द्यायचे असतील त्यांनी ते संस्थेच्या कार्यालयात आणून द्यावेत, तसेच मुलींच्या पदव्युत्तर शिक्षणासाठी महिला समाजाचे आर्थिक सहाय्यही मिळू शकेल.

## पत्र प्रतिक्रिया

Dear Rajan

It was very exciting to read your article **Watsons Esplanade Hotel in the Prabhu Tarun**

I was particularly curios about fact mentioned in your Article

By 1909 there were 15 hotels, 43 refreshment rooms, 1839 eating houses 494 Tea & Coffee shops ,73 cold drink shops ,114 Boarding & lodging houses,36 Boarding houses

My anxiety is did this mean a oversupply of room inventory in Upscale category of rooms in Mumbai as per Demand in those days which resulted in closure of this monumental hotel

Something that happened in Pune between 2006- 2012 where in Pune had more classified room inventory than demand

History repeats hence the curiosity

Thanks & Regards,

**-Milind Kothare,**
# 9920023860

हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४००१०२ येथे प्रकाशित केले.

**संपादक: श्रीमती सुहासिनी कीर्तिकर** RNI NO. 14613/67